


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १५७ • पुणे • सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



जिल्हाध्यक्षपदी सार्थक पाटील यांची नियुक्ती 3



कार्यकर्त्यांनो एप्रिलमध्ये मोठ्या मैदानात जल्लोष करूया 4

# तिजोरी श्रीनाथ भिमालेंच्या हाती !

## विषय समित्यांची अध्यक्षपदाची निवडणूक २७ फेब्रुवारीला होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या कोणाच्या ताब्यात जाणार, याचा फैसला सोमवारी झाला. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांची निवड झाली. महापालिकेच्या सभागृहात अध्यक्षपदाची निवडणूक झाली. त्यामध्ये भिमाले यांची बिनविरोध निवड झाली.



पुणे महापालिकेत सर्वाधिक जागा मिळवित दुसऱ्यांदा सत्ताधारी झालेल्या भारतीय जनता पक्षाकडून (भाजप) पाहिल्या वर्षी अध्यक्षपदासाठी कोणाला संधी मिळणार याबाबत निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून मोठी उत्सुकता होती. सुरुवातीपासूनच श्रीनाथ भिमाले यांच्यासह अन्य काही ज्येष्ठ नगरसेवकांच्या नावाची चर्चा होती. भाजपने महापौर पद सिंहगड रस्त्याला दिले. उपमहापौर पद बोपोडी भागात दिले. तर सभागृह नेते म्हणून गणेश बीडकर यांच्याकडे जबाबदारी देत कसबा विधानसभा मतदारसंघात संधी दिली. त्यामुळे स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची संधी कोणत्या विधानसभा मतदारसंघाला मिळणार याबाबत तर्क वितर्क लावले जात होते.

गेल्या आठवड्यात झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये स्थायी समितीच्या सदस्यपदी भाजपने १२ सभासदांची निवड केली. यामध्ये आठ महिला सभासदांना तर चार नगरसेवकांना संधी दिली. स्थायी समितीमध्ये १६ पैकी १२ सभासद हे भाजपचे, तीन सभासद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे तर एक सदस्य काँग्रेसचा आहे. त्यामुळे भाजपचा अध्यक्ष होणार हे निश्चित होते. भाजपने भिमाले यांना सदस्यपदी संधी दिल्याने तेच अध्यक्ष होणार हे स्पष्ट होते. त्याची औपचारिकता सोमवारी पार पडली.

भाजपकडून भिमाले यांनी अर्ज भरला होता. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून सुहास टिंगरे यांनी अर्ज भरला होता. मात्र हा अर्ज भरताना एक मिनिट उशीर झाला होता. विभागीय आयुक्तांनी या निवडणुकीसाठी पिठासीन अधिकारी म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (एसआरए) मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांची नियुक्ती केली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक झाली.

निवडणुकीला सुरुवात झाल्यानंतर अर्जाची छाननी झाली. त्यामध्ये टिंगरे यांचा अर्ज बाद करण्यात आल्याने भिमाले यांची निवड बिनविरोध झाली. भिमाले यांनी चार अर्ज भरले होते. तर टिंगरे यांनी एक अर्ज भरला होता.

## ठळक बातम्या

### चेन्नईतील समुद्रात दोघे बुडाले

पुणे (आरंभ पर्व) : पंधरवड्यापूर्वी चेन्नईतील एका नामवंत माहिती-तंत्रज्ञान कंपनीत रूजू झालेल्या महाराष्ट्रातील तरुणीसह दोघे जण बुडाले. या घटनेत तरुणीचा मृत्यू झाला. समुद्रात बुडालेल्या एका तरुणाचा शोध लागलेला नाही. पुण्यातील तरुण मात्र, या दुर्घटनेतून बचावला आहे. मयूरी चौधरी असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे. समुद्रात बुडालेल्या जय पाटील याचा अद्याप शोध लागलेला नाही. त्याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पुण्यातील तरुण राज केदारी हा सुखरूप आहे. मयूरी चौधरी मूळची भंडारा जिल्ह्यातील आहे. जय पाटील मूळचा जळगावचा आहे. राज केदारी हा पुण्यातील रहिवासी आहे. तिघे जण पंधरा दिवसांपूर्वी चेन्नईतील नामवंत माहिती-तंत्रज्ञान कंपनीत रूजू झाले होते. तीन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर त्यांना कंपनीत पूर्णवेळ नोकरी देण्यात येणार होती. चेन्नईतील मचिया नारायण मंदिरात शनिवारी या कंपनीतील प्रशिक्षणार्थी कर्मचारी दर्शनासाठी गेले होते. त्या वेळी मयूरी, राज आणि जय हे समुद्रात उतरले. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तिघे जण बुडाले. त्या वेळी किनाऱ्यावर असलेल्या प्रशिक्षणार्थींनी आरडाओरडा केला. मयूरी आणि राज यांना पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले. मात्र, पाण्याच्या प्रवाहात जय वाहून गेला. दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.



## भांडणाच्या रागातून तरुणाने लावली झोपडपट्टीला आग, १९ झोपड्या भस्मसात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर भागातील राम मनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी पहाटे आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी भस्मसात झाल्या. आग लागल्यानंतर मजूर आणि त्यांचे कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशामक दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. मात्र या आगीमागे एका तरुणाचा हात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. समर्थ तुपे (वय २०, रा. हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावर राम मनोहर लोहिया उद्यान आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. वसाहतीतील एका झोपडीला शनिवारी पहाटे अडीचच्या सुमारास आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरूपात बांबू आणि पत्र्याचा वापर करून बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागल्यानंतर वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाने घटनास्थळ धाव घेऊन अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

पोलिसांनी परिसरातील रहिवाशांची चौकशी केली. तेव्हा वसाहतीला आग ही दुर्घटना नसून, वसाहतील एका तरुणाशी वाद झाल्याने त्याची दुचाकी पेटवून देण्यात आली. दुचाकीने पेट घेतल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांना आग लागली, अशी माहिती चौकशीत मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तपास करुन आरोपी समर्थ तुपे याला ताब्यात घेतले. तुपे याची चौकशी करण्यात आली. तेव्हा त्याचा वसाहतीतील एका तरुणाशी वाद झाला होता. वादातून त्याने दुचाकी पेटवून दिली. त्यानंतर या दुचाकीची झळ शेजारी असलेल्या दोन दुचाकींना पोहोचली. आग भडकल्यानंतर त्याची झळ झोपड्यांना बसली.

# तलवारीने केक कापणाऱ्या टोळक्याविरुद्ध गुन्हा

## समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर कारवाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भर चौकात वाढदिवस साजरा करताना तलवारीने केक कापणाऱ्या टोळक्या विरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हडपसरमधील शेवकर वस्ती परिसरात ही घडली. समाज माध्यमात तलवारीने केक कापतनाची चित्रफीत प्रसारिर झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन शस्त्र बाळगणे, तसेच दहशत माजविल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भर चौकात तलवार, कोयत्याने केक कापून वाढदिवस साजरा करणाऱ्यांविरुद्ध यापूर्वी पोलिसांनी गुन्हे दाकल केले आहेत. अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या टोळक्याविरुद्ध थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. १८ फेब्रुवारी रोजी वानवडी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड यांनी समाज माध्यमात प्रसारित झालेली चित्रफीत पाहिली. तलवारीने केक कापून दहशत माजवित असल्याचे दिसून आले. त्यानंतर वानवडी पोलिसांच्या पथकाने टोळक्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा हडपसर भागातील शेवकर वस्ती परिसरात १७ फेब्रुवारी रोजी तलवारीने केक कापून टोळक्याने केक कापून वाढदिवस साजरा केल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी परिसरातील नागरिकांकडे चौकशी केली. तेव्हा टोळक्याने तलवारीने केक कापून दहशत माजविल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. भर चौकात तलवारीने वाढदिवस साजरा करुन वाढदिवस साजरा करणाऱ्या टोळक्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब जाधव यांनी दिला आहे.

# वडिलांच्या नावाची सक्ती नको

## मुंबई उच्च न्यायालय : आता मुलाच्या ओळखीत आईचे नाव-आडनाव व जात लावण्यास मान्यता



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एकट्या आईने वाढवलेल्या पाल्याला केवळ अर्जाच्या स्वरुपाच्या गरजेनुसार वडीलांचे नाव, आडनाव आणि जात लावण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच, अल्पवयीन मुलीला शाळेच्या नोंदींमध्ये तिचे नाव आणि जात बदलण्याची परवानगी दिली.

पाल्याच्या सार्वजनिक ओळखीसाठी एकट्या आईला पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे हे दानधर्माचे काम नाही, तर संवैधानिक निष्ठा आहे. तसेच, असे करणे हे पितृसत्ताक सक्तीपासून संवैधानिक निवडीकडे आणि हक्क म्हणून प्रतिष्ठेकडे जाण्याचे प्रतिबिंब आहे, असे निरीक्षणही न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने उपरोक्त महत्त्वपूर्ण निर्वाळा देताना नोंदवले.

मुलाची किंवा मुलीची सार्वजनिक ओळख त्यांच्या आयुष्यात अनुपस्थित असलेल्या वडीलांपर्यंत मर्यादित असावी आणि वडीलांच्या अनुपस्थितीत पाल्याच्या संगोपनाचा संपूर्ण भार उचलणारी आई प्रशासकीयदृष्ट्या दुय्यम राहावी, असा आग्रह विकसित म्हणवणारा समाज करू शकत नाही, असेही न्यायालयाने याचिकाकर्तीला दिलासा देताना नमूद केले. तसेच, आईनेच वाढवलेल्या मुलाला राज्य सरकारने निश्चित केलेल्या अर्जाच्या नमुन्याप्रमाणे, वडिलांचे नाव आणि आडनाव केवळ आधीपासून मागणी केली जात आहे म्हणून लावण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही याचा पुनरूच्चारही न्यायालयाने केला.

बारा वर्षांच्या बलात्कार पीडित मुलीच्या वतीने करण्यात आलेल्या याचिकेत, शाळेच्या नोंदींमध्ये तिचे नाव आणि जात मराठावरून अनुसूचित जाती-महार अशी नोंद करण्याची मागणी करण्यात आली होती. याचिकाकर्ती मुलाची एकल आणि नैसर्गिक पालक आहे. तिने मुलाच्या वडीलांनी लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला होता.

नंतर दोघांनी तडजोडीद्वारे प्रकरण मिटवले. त्यांच्यात झालेल्या तडजोडीनुसार, मूल कायमस्वरूपी आईच्या ताब्यात राहील आणि वडीलांची पालक म्हणून कोणतीही भूमिका राहणार नाही. त्यामुळे, याचिकाकर्तीने मुलाच्या शालेय नोंदींमध्ये नाव आणि जात बदलण्याची मागणी केली होती. ती गेल्या वर्षी अधिकाऱ्यांनी फेटाळली, त्याविरोधात याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आईकडे मुलाचा पूर्ण ताबा आहे आणि त्याचे वडील कोणत्याही कायदेशीर किंवा कार्यात्मक अर्थाने अल्पवयीन मुलाच्या जीवनाचा भाग नाहीत, असेही तिने याचिकेत उपरोक्त मागणी करताना म्हटले होते.

न्यायालयानेही याचिकाकर्तीची मागणी योग्य ठरवली. तसेच, राज्य सरकारने धोरणात्मक बाब म्हणून आईचे नाव ओळखपत्रांमध्ये केंद्रस्थानी लावले जाऊ शकते हे मान्य केलेले आहे. असे असताना, एक कनिष्ठ अधिकारी याचिकाकर्तीची मागणी कशी नाकारू शकतो ? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.


राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा मूलभूग अधिकार दिला असून त्यात अनुपस्थित पालकांचे नाव, आडनाव, जात जबरदस्तीने न जोडता ओळखपत्र मिळण्याच्या अधिकाराचा समावेश आहे. तथापि, बळजबरीने असे ओळखपत्र मिळवण्याचा कोणताही कल्याणकारी उद्देश पूर्ण करत नाही. याउलट त्याने सामाजिक हानी होते, असे न्यायालयाने नमूद केले.

शालेय दस्तावेज या खासगी नोंदी नाहीत. तर एक सार्वजनिक दस्तऐवज असून वर्षानुवर्षे, संस्थांमध्ये आणि कधीकधी व्यावसायिक क्षेत्रात मुलांसाठी आवश्यक असतात, असे न्यायालयाने म्हटले. त्याचवेळी, ओळख वडिलांमार्फत आली पाहिजे ही धारणा प्रशासकीय चूक नाही, तर पितृसत्ताक रचनेतून मिळालेली सामाजिक धारणा आहे. त्यातून वंशाला पुरुषांची मालमत्ता आणि महिलांना सार्वजनिक ओळखीच्या उद्देशाने उपांग मानते, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली.

वडिलांचे नाव अपरिहार्य आहे असा आग्रह धरणारे प्रशासन, आईचे नाव ऐच्छिक आहे असे म्हणून केवळ एका प्रथेचे पालन करत नाही, तर ते कागदपत्रांद्वारे असमानता निर्माण करत असल्याचा असा टोलाही न्यायालयाने हाणला.

### अधिकाऱ्यांना आदेश

**पालकत्व, संगोपन, त्याग, हिंसाचार किंवा सामाजिक स्वीकृती याकडे दुर्लक्ष करून, पितृत्वाची ओळख ही जातीचा एकमेव मार्ग मानणारी प्रथा संरचनात्मक असमानता निर्माण करते आणि समान संरक्षण नाकारते. सध्याच्या प्रकरणात, मूल केवळ आईच्या सामाजिक वातावरणात आणि तिच्या जातीच्या समुदायात वाढले आहे, असे नमूद करून संबंधित शाळा अधिकाऱ्यांनी मुलाचे नाव दुरुस्त करून त्यात आईचे नाव आणि जात समाविष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.**






# राहुल गांधींनी माफी मागावी

## शिवसेनेचा इशारा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवी दिल्ली येथे पार पडत असलेल्या 'ग्लोबल साऊथ ए.आय. समिट'च्या पार्श्वभूमीवर देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिमा उंचावण्याची ऐतिहासिक संधी असताना आंदोलनाच्या माध्यमातून भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न निंदनीय असल्याची टीका शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. जागतिक मंचावर देशांतर्गत राजकारण मांडणे म्हणजे भारताच्या सन्मानावर घाला असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी म्हटले. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) सारख्या भविष्योन्मुख विषयात भारत नेतृत्व सिद्ध करत असताना काही राजकीय नेत्यांना देशहितापेक्षा पक्षहित महत्त्वाचे वाटत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. भारत जागतिक पातळीवर तंत्रज्ञान आणि नवोपक्रम क्षेत्रात आघाडी घेण्याचा प्रयत्न करत असताना अशा कृतींमुळे चुकीचा संदेश जात असल्याचे मत व्यक्त झाले.

तसेच 'भारत-अमेरिका व्यापार करार' संदर्भात बोलताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत वापरलेला 'कॉम्प्रमाईज्ड' हा शब्द केवळ व्यक्तीवर नव्हे, तर देशाच्या सर्वोच्च पदावर आघात करणारा असल्याचा आरोप शिवसेनेने केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पंतप्रधानांविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे लोकशाही परंपरेला आणि राष्ट्राच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. शिवसेनेने या वक्तव्याचा जाहीर निषेध करत राहुल गांधी यांनी देशाची तात्काळ माफी मागावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

**या निषेध आंदोलनात माजी उपमहापौर आबा बागुल, युवासेना सचिव किरण साळी, उपजिल्हाप्रमुख अमर घुले, उपजिल्हा संघटक पंकज कोद्रे, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश घारे, सोमनाथ कुटे, युवासेना शहर प्रमुख निलेश गिरमे, सुदर्शना त्रिगुनाईत, उपशहर प्रमुख दत्ता खवळे, सुहास पडवळ, संजय डोंगरे, विकी माने, प्रमोद प्रभुणे, संतोष लांडगे, सुधीर कुरुमकर, नवनाथ निवंगुणे, दीपक कुलाळ, प्रवीण हेलगे, अक्षय टकले, महेंद्र जोशी, अक्षय तारू, संतोष जाधव, संदेश पावसकर, अनिकेत सपकाळ, विशाल पवार, अश्विनी मल्हारी, शंतनु सरकार यांच्यासह अनेक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# संस्कृती, धर्म जपणं हेच आपले कर्तव्य : हभप मोरे महाराज

## श्रीमंत काळूबाई मूर्ती स्थापनेचा अकरावा वर्धापन दिन भक्तिमय वातावरणात संपन्न

**उत्तमनगर (कोंढवे-धावडे) (दै. आरंभ पर्व)**

उत्तमनगर येथील ग्रामदैवत श्रीमंत काळूबाई देवी मूर्ती स्थापनेचा अकरावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात, धार्मिक श्रद्धा आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विविध धार्मिक विधी, कीर्तन, भजन आणि महाप्रसाद वितरणामुळे दिवसभर परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थ, महिला भगिनी, युवक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला.



कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पूजा-अर्चा व धार्मिक विधींनी झाली. यानंतर आयोजित कीर्तनात हभप. शंकर महाराज मोरे यांनी प्रभावी निरूपणातून समाजाला मार्गदर्शन केले. "आपली संस्कृती आणि धर्म वाढवण्यापेक्षा त्यांचे जतन करणे अधिक महत्त्वाचे आहे. संतांनी दिलेल्या शिकवणीवर आपण वाटचाल केली, तरच समाजाची खरी प्रगती होऊ शकते," असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या ओजस्वी कीर्तनामुळे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा मिळाली.

या सोहळ्याला खडकवासल्याचे आमदार भीमराव (आण्णा) तापकीर प्रमुख उपस्थित होते. त्यांनी मंदिर सेवा ट्रस्टचे उत्सव अध्यक्ष सुभाषभाऊ नाणेकर व सर्व कार्यकर्त्यांचे कौतुक करताना सांगितले की, "काळूबाईच्या माध्यमातून येथे एक आदर्श धार्मिक परंपरा निर्माण झाली आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील एकात्मता दृढ होते आणि सर्वांच्या प्रगतीचा मार्ग सुकर होतो."

यावेळी कार्यक्षम नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "आई काळूबाईच्या कृपेने मला आयुष्यात सर्व काही मिळाले. सार्वजनिक जीवनात जनतेच्या हितासाठी काम करता आले, हीच माझी मोठी कमाई आहे. पुढील काळातही सामाजिक कार्यातून समाजासाठी प्रयत्न करत राहणार आहे." सर्वसामान्यांना हिताचे मी काम करणार आहे," असे स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी भाजपा नेते अरुणभाऊ दांगट, नगरसेवक अरुणभाऊ राजवाडे, काकासाहेब चव्हाण, उपाध्यक्ष शुक्राचार्यजी वांजळे, माजी नगरसेवक विकास (नाना) दांगट, जिल्हाप्रमुख रमेश (बाप्पू) कोंडे, नगरसेविका अनिताताई इंगळे, नगरसेविका धनश्रीताई कोल्हे, पंचायत समिती सदस्या शुभांगीताई खिरीड, भाजपा नेते दत्ताभाऊ कोल्हे, अध्यक्ष त्रिंबक (आण्णा) मोकाशी, माजी स्वीकृत नगरसेवक सचिनभाऊ दांगट, माजी उपसरपंच अतुल (आप्पा) धावडे, उपाध्यक्षा निलिमाताई गवांडे, अध्यक्ष विजयराव मते, नेते अनिलजी मते, अजयभाऊ मते, अध्यक्ष प्रमोदजी धुमाळ, उपाध्यक्ष सौरभ (तात्या) किंडरे, भरत (तात्या) उरीट, सुभाष (आण्णा) शिंदे (सरकार), सारंग (बाप्पू) राडकर, माजी उपसरपंच काशिनाथजी धुमाळ, दत्ताजी मारणे, अमरजी धावडे, महेशजी धावडे, सचिनजी धावडे, सुरजजी दुधाणे, बबनराव धावडे, रोहिदासजी दुधाणे, संतोषजी पवार, गणेशभाऊ गवांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दिवसभर चाललेल्या धार्मिक कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भजनी मंडळींच्या नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगून गेला.

धार्मिक परंपरा, समाजएकता आणि भक्तीभाव यांचे दर्शन घडविणारा हा सोहळा ग्रामस्थांसाठी संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे आयोजन श्रीमंत काळूबाई मंदिर सेवा ट्रस्ट व समितीच्या वतीने करण्यात आले होते.

# समाविष्ट गावांच्या विकासासाठी विशेष निधीची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



- **जाचक करप्रश्नावर नगरसेवक सुभाष नाणेकर आक्रमक**

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या गावांच्या विकासासाठी स्वतंत्र व विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अन्यथा या भागांचा अपेक्षित विकास होणार नाही, अशी ठाम मागणी नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी केली. महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेमध्ये त्यांनी समाविष्ट गावांकडे प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाचा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला. समाविष्ट गावांमध्ये मूलभूत सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्ट्रीटलाइट्स, आरोग्य व स्वच्छता यांसारख्या आवश्यक सुविधांचा अभाव जाणवत असताना नागरिकांकडून मात्र शहराप्रमाणे कर आकारले जात असल्याचे नाणेकर यांनी निदर्शनास आणले. विकासकामे न होता केवळ करांचा बोजा टाकणे अन्यायकारक असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवले ब्रीज अपघातप्रश्नी 'एस्केप/रनवे रॅम्प'ची अनोखी संकल्पना

## माजी उपसरपंच अक्षय इंगळे यांचा पुढाकार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे–बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रीज परिसरात वारंवार होणाऱ्या भीषण अपघातांच्या पार्श्वभूमीवर नऱ्हे गावचे माजी उपसरपंच श्री. अक्षय सुभाष इंगळे यांनी 'एस्केप/रनवे रॅम्प' उभारण्याची अनोखी संकल्पना मांडली आहे.



या संदर्भात त्यांनी प्राथमिक निवेदन केंद्रीय मंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ, पुणे महापौर सौ. मंजुषा नागपुरे, उपमहापौर श्री. परशुराम वाडकर तसेच भाजप पुणे शहर सचिव श्री. रवींद्र साळेगावकर यांना दिले.

नवले ब्रीजवर गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अपघात होत असून काही दिवसांपूर्वीही गंभीर अपघात घडला होता. या मार्गावरील तीव्र उतारामुळे जड वाहनांचे ब्रेक निकामी होणे, वाहनांवरील नियंत्रण सुटणे अशा घटना वारंवार घडतात. त्यामुळे हा परिसर पुणे शहरातील अतिसंवेदनशील अपघातप्रवण ठिकाण म्हणून ओळखला जात आहे.

या समस्येवर उपाय म्हणून 'एस्केप किंवा रनवे रॅम्प' ही प्रभावी सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव इंगळे यांनी मांडला आहे. ब्रेक फेल झालेल्या किंवा नियंत्रणाबाहेर गेलेल्या वाहनांना सुरक्षितपणे थांबवण्यासाठी अशा रॅम्पचा उपयोग होतो आणि मोठ्या दुर्घटना टाळता येतात, असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांनी या विषयाची दखल घेत त्वरित वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्याची ग्वाही दिली आहे. नवले ब्रीजवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संत निरंकारी मिशनचे पुण्यामध्ये विशाल स्वच्छता अभियान संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) : जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवार, 22 फेब्रुवारी 2026, सकाळी 8 ते 11 वाजेपर्यंत, परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिता रमीत जी यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत पुण्यामध्ये मुळा मुठा नदीच्या विविध घाटांवर विशाल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.**

### कै. शालन उत्तमराव भोंडवे यांचे निधन



**उरुळी कांचन(आरंभ पर्व) : लोणीकंद(ता.हवेली) येथील संत समाज विचार प्रसार प्रबोधन केंद्राचे संस्थापक अध्यक्ष तथा लोणीकंदचे ज्येष्ठ समाजसुधारक ह.भ.प.उत्तमराव भोंडवे यांच्या पत्नी कै.शालन उत्तमराव भोंडवे यांचे वयाच्या -७२ वर्षी शनिवारी दि.२१ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी रविवारी २२ फेब्रुवारी रोजी, लोणीकंद येथे पार पडला.**

### इंटिग्रेटेड इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्सची सुरुवात

**पुणे (आरंभ पर्व) : भारतातील पहिले १००% एफडीआय-निधीत तृतीयस्तरीय आरोग्यसेवा रुग्णालय असलेल्या सकरा वर्ल्ड हॉस्पिटलने आपल्या अत्याधुनिक आणि एकात्मिक 'इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स'चे उद्‌घाटन केले. अचूकता-आधारित, तंत्रज्ञान-सक्षम आणि रुग्ण-केंद्रित कॅन्सर व हिमॅटोलॉजी उपचार एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या विशेष केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. नवीन संस्थेमध्ये मेडिकल ऑन्कोलॉजी, सर्जिकल ऑन्कोलॉजी, ब्रेस्ट ऑन्कोलॉजी, हिमॅटोलॉजी, ॲनेस्थेसियोलॉजी, क्रिटिकल केअर तसेच प्रगत शस्त्रक्रिया तज्ज्ञता यांसह संपूर्ण ऑन्कोलॉजी सेवा उपलब्ध असतील. आधुनिक निदान सुविधा आणि मल्टिडिसिप्लिनरी ट्यूमर बोर्ड्स यांच्या सहकार्याने या सेवा पुरवल्या जातील. या एकात्मिक मॉडेलमुळे समन्वित निर्णयप्रक्रिया आणि प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार वैयक्तिकृत उपचार योजना निश्चित होईल.**

# बुधवार पेठ रेड प्रकरण : पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

## 'गिऱ्हाईकांना सार्वजनिकरीत्या बसवणे कायदेशीर का?'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बुधवार पेठेत झालेल्या पोलिसांच्या मोठ्या कोंबिंग ऑपरेशननंतर आता पोलिसांच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत. रेड दरम्यान ग्राहक म्हणून आलेल्या नागरिकांना रस्त्यावर बसवून चौकशी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मानवाधिकार उल्लंघनाचा मुद्दा पुढे आला असून, पोलिसांच्या कारवाईवर टीकेची झोड उठली आहे.



११ फेब्रुवारीच्या मध्यरात्री पुणे पोलिसांनी बुधवार पेठ परिसरात मोठी रेड टाकत अनेक इमारतींची झडती घेतली. या कारवाईत शेकडो नागरिकांची चौकशी करण्यात आली. काही पुरुषांना रस्त्यावर बसवून ठेवण्यात आल्याचे दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाले. यामुळे पोलिसांच्या पद्धतीवर तीव्र आक्षेप नोंदवले जात आहेत.

या संदर्भात वकिलांकडून मानवाधिकार आयोगाकडे तक्रारही दाखल करण्यात आली आहे. कोणताही गुन्हा सिद्ध नसताना नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी बसवून ठेवणे, त्यांची ओळख उघड होण्याची शक्यता निर्माण करणे आणि अपमानास्पद वागणूक देणे हा मानवी हक्कांचा भंग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कायद्याच्या दृष्टीने पाहता, इमोरल ट्रॅफिक प्रिव्हेन्शन ॲक्टनुसार पोलिसांना संशयित ठिकाणी वॉरंटशिवाय छापा टाकण्याचा अधिकार आहे. विशेष पोलिस अधिकारी (SPO) यांच्या नेतृत्वाखाली अशा कारवाया करता येतात. झडती घेणे, पुरावे जप्त करणे आणि पीडित महिलांना संरक्षण देणे यासाठी ही तरतूद आहे. मात्र, कारवाई करताना गोपनीयता आणि मानवी हक्कांचे पालन करणेही तितकेच बंधनकारक आहे.

याच ठिकाणी वाद निर्माण झाला आहे. ग्राहक म्हणून आलेल्या व्यक्तींना सार्वजनिकरीत्या बसवणे आणि त्यांची चौकशी करणे कायदेशीर मर्यादेत होते का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. कायद्यात 'फक्त ग्राहक म्हणून उपस्थित असणे' हा स्वतंत्र गुन्हा ठरत नाही, असे काही न्यायालयीन निर्णयांत नमूद करण्यात आले आहे. वेश्यालय चालवणे, दलाली करणे, तस्करी करणे किंवा अल्पवयीन मुलींचा गैरवापर करणे सिद्ध झाल्यासच कठोर गुन्हा नोंदवता येतो.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जागा अपुरी असल्याने चौकशी रस्त्यावर करण्यात आली असावी. तसेच व्हायरल व्हिडिओ पोलिसांनी अधिकृतरीत्या प्रसिद्ध केले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तरीही व्हिडिओ कसा बाहेर आला, याबाबत शंका कायम आहे.

**या कारवाईदरम्यान काही अल्पवयीन मुलींची ओळख उघड झाल्याचा आरोप सामाजिक संघटनांनी केला आहे. त्यामुळे पोलिसांनी कारवाई करताना संवेदनशीलता आणि प्रक्रियेचे पालन केले का, यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. कायदा पोलिसांना छाप्याचे अधिकार देतो, मात्र नागरिकांचा सन्मान, गोपनीयता आणि मूलभूत अधिकार अबाधित ठेवणे हीही त्यांची जबाबदारी आहे. बुधवार पेठेतील कारवाईत ही समतोल साधला गेला का, की अतिरेक झाला, याचा निर्णय आता चौकशी आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.**



# एकता महिला मंचतर्फे शिवजयंती उत्साहात साजरी

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

एकता महिला मंचच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती बार्शी येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. शिवसृष्टी येथे आयोजित कार्यक्रमात मंचच्या सर्व सदस्यांनी एकत्र येत शिवरायांच्या कार्याचा गौरव केला व त्यांच्या विचारांना अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज हे जनतेच्या हितासाठी कार्य करणारे लोकनायक होते, असे सांगत त्यांच्या स्वराज्य, न्याय व जनकल्याणाच्या विचारांचा प्रसार घराघरांत झाला पाहिजे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. कार्यक्रमानिमित्त महिलांची भव्य बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीमध्ये महिला भगिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत शिवजयंतीचा संदेश शहरभर पोहोचविला. भगवे झेंडे, घोषणाबाजी आणि शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमास बार्शी तालुक्यातील महिला पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. एकता महिला मंच ही संस्था महिलांना सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक बळ देण्यासाठी सातत्याने कार्यरत असून महिलांना उभारी देण्याचे महत्त्वपूर्ण काम करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# VISTA 2K26 दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद






## १००० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने आयोजित VISTA 2K26 – द ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हिंजवडी येथील मेझ्झा ९ येथे पहाटे ६.३० वाजल्यापासून सुरू झालेल्या या क्रीडा महोत्सवात तब्बल १००० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाला मोठे यश मिळवून दिले. महाविद्यालयीन फेस्टमध्ये आयोजित करण्यात आलेली ही ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन स्पर्धा विशेष ठरली. स्पर्धेत ५ किमी धावणे, ४० किमी सायकलिंग आणि १० किमी धावणे असे तीन आव्हानात्मक टप्पे होते. याशिवाय ५ किमी व १० किमी मॅरेथॉन आणि साईबालाजी पब्लिक स्कूलच्या सहकार्याने १.५ किमी 'फन रन'चेही आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे अत्याधुनिक आरएफआयडी ट्रॅकिंग प्रणालीचा वापर. प्रत्येक स्पर्धकाच्या बिबवर आरएफआयडी चिप बसविण्यात आल्यामुळे धावपट्टूंची सुरुवात, प्रत्येक टप्प्यावरील वेळ आणि अंतिम वेळ अचूकपणे नोंदवली गेली. त्यामुळे मानवी चुका टळल्या आणि निकाल प्रक्रिया जलद व पारदर्शक झाली. सहभागी स्पर्धकांना अधिकृत बिब टाइम सर्टिफिकेटही देण्यात आले.

विद्यार्थी, व्यावसायिक खेळाडू, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि फिटनेसप्रेमी नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये फिटनेस, शिस्त, सहनशक्ती आणि समुदाय सहभागाची भावना निर्माण करणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व सहभागी, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या संस्थांचे आयोजकांनी आभार मानले. संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष मुंदडा यांनी सांगितले की, "डुअथलॉन हा केवळ क्रीडा उपक्रम नसून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी व्यासपीठ आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात आरोग्य व फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील." सचिव प्रा. निरूपमा मुंदडा यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. या स्पर्धेच्या यशामुळे साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने उत्कृष्ट आयोजन क्षमता पुन्हा सिद्ध केली असून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला नवी उभारी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

डुअथलॉन विजेते पुरुष गटामध्ये १) सपान पांचाळ, ईश्वर पाटील, क्षेतमयूम कबिदाश तर डुअथलॉन विजेते महिलामध्ये १) ऐश्वर्या दुधाडे, २) साक्षी पांडे, ३) किरणाक्षी राजपूत यांनी आपली मोहोर उमटवली






दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६














# मधमाशीपालनातून नवा उत्पन्नाचा स्रोत - श्रद्धा गुंजाळ

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले. त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक




सक्षमीकरण या विषयावरील पाच दिवशीय (दि.१६ ते २०) प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. या प्रसंगी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.

श्रद्धा गुंजाळ यांनी बोलताना मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले.

मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना तुलनेने कमी गुंतवणूकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मधमाशीपालन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायभिमुखता वाढीस लागेल असे सांगितले.

ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि कृषीपूरक व्यवसायांना चालना देणे या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन डॉ. सागर थेऊरकर, डॉ. योगेश वाळूंज यांनी केले. यात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव व प्रास्ताविक प्रा. निता डोंगरे यांनी केले. प्रा. योगिता डुंबरे यांनी आभार मानले.

## ४७ वर्षांनंतर कमल हासन आणि रजनीकांत एकत्र

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रेड जायंट मूव्हीजच्या आगामी चित्रपट 'KHxRK' मुळे भारतीय चित्रपटसृष्टी एक ऐतिहासिक क्षण अनुभवणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून भारतीय सिनेमातील दोन सर्वात मोठे आणि प्रतिष्ठित दिग्गज कमल हासन आणि रजनीकांत, तब्बल 47 वर्षांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या दोन्ही महान कलाकारांनी शेवटचे एकत्र काम 1970 च्या दशकात केले होते. जवळपास पाच दशकांनंतर त्यांचे पुन्हा एकत्र येणे हे भारतीय चित्रपट इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानले जात आहे. कारण हा चित्रपट



अशा दोन वारशांचा संगम आहे, ज्यांनी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही पिढ्यान्‌पिढ्या प्रेक्षकांवर खोल प्रभाव टाकला आहे. सध्या या चित्रपटाची निर्मिती रेड जायंट मूव्हीज करत आहे. या दोन सिनेमाई दिग्गजांना एकत्र आणण्याचे स्वप्न या प्रोडक्शन हाऊसने साकार केले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाकडे भव्यता, वारसा आणि उत्कृष्ट कथाकथनाचा उत्सव म्हणून पाहिले जात आहे.

## शिवतत्त्व तत्त्व आत्मसात करणे आवश्यक

**पुरंदर (दै. आरंभ पर्व)**

गुरोळी (कैलास मठ) : मनुष्य आयुष्यभर भौतिक सुखाच्या मागे धावत राहतो आणि मोहमायेच्या जाळ्यात अडकून जीवनाच्या प्रारंभ, मध्य व अंत या टप्प्यांचा विचार करत नाही. जन्म, वृद्धत्व आणि मृत्यू या अटळ सत्यांमधून प्रत्येकाला जावे लागते. त्यामुळे पृथ्वीवर अस्तित्व असेपर्यंत सुखी, समाधानी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी शिवतत्त्व आणि श्रीकृष्ण तत्त्व आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे महाराज यांनी केले.

## जिल्हाध्यक्षपदी सार्थक पाटील यांची नियुक्ती

**सांगली (दै. आरंभ पर्व)**

मराठा समाजातील वैचारिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद कक्षाच्या सांगली जिल्हाध्यक्षपदी सार्थक गणेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी जाहीर करण्यात आली असून समाजातील विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



जिल्ह्यातील पत्रकार परिषद कक्षाचे संघटनात्मक बळकटीकरण, समाजप्रबोधन आणि पत्रकारांना संघटित करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सार्थक पाटील यांनी समाजकार्य व संघटनात्मक कार्यामध्ये सातत्याने योगदान दिले असून, त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टता, नेतृत्वगुण आणि संघटन कौशल्य यांची झलक दिसून येते. त्यांच्या नियुक्तीमुळे सांगली जिल्ह्यात पत्रकार परिषद कक्षाच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नियुक्तीपत्रामध्ये त्यांना पदाचा कार्यभार तत्काळ स्वीकारून जबाबदाऱ्या निष्ठापूर्वक पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष आर.एस. पवार यांनी त्यांना शुभेच्छा देत आगामी कार्यकाळ यशस्वी होवो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

मराठा सेवा संघाच्या वतीने ही नियुक्ती संघटनेच्या बळकटीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, सांगली जिल्ह्यातील सामाजिक व पत्रकारितेच्या क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### श्रीक्षेत्र निळकंठेश्वर मंदिर पायथ्यापर्यंत 'पीएमपीची सेवा सुरू करा'



**पुणे (आरंभ पर्व) :** पानशेत येथील श्री क्षेत्र निळकंठेश्वरला येणाऱ्या- जाणाऱ्या भाविकांसाठी पीएमपीची मिनी बससेवा सुरू करावी, अशी मागणी भाजप कार्यकर्ते राजेश्वर शर्मा, पुणे महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते श्याम सातपुते, माजी उपमहापौर नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे खासदार जनसंपर्क अभियानात निवेदनाद्वारे केली. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, गणेश बिडकर , आमदार सिद्धार्थ शिरोळे आदी उपस्थित होते. पानशेत येथील डोंगरावर असलेल्या निळकंठेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. विशेषतः दर सोमवारी भाविकांची मोठी गर्दी होते. मात्र, या ठिकाणी जाणारा रस्ता अरुंद असून, पीएमपीची बससेवा उपलब्ध नाही. त्यामुळे स्वतःची वाहने नसलेल्या नागरिकांना निळकंठेश्वर मंदिरात जाण्यासाठी पायथ्यावरील वाहन किंवा रिक्षाने जावे लागते. त्यामुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे सर्वसामान्य भाविकांना परवडणारी सेवा उपलब्ध व्हावी यासाठी पीएमपीकडून मिनी बस या मार्गावर सोडण्यात याव्यात, जेणेकरून भाविकांची गैरसोय टळेल, अशी मागणी ॲड. प्रसन्नदादा जगताप, शर्मा , सातपुते यांनी केली आहे.

## प्रभाग स्वच्छता व कचरा व्यवस्थापन आढावा बैठक संपन्न

### नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांचा स्वच्छतेवर भर; संबंधित यंत्रणांना दिल्या सूचना

**बैठकीनंतर स्वच्छता व्यवस्थेत अधिक कार्यक्षमतेने काम करण्याचे निर्देश देण्यात आले असून, लवकरच त्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 34 नऱ्हे धायरी वडगाव प्रभागातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस आरोग्य निरीक्षक, मुकादम, आरोग्य सेवक तसेच 'स्वच्छ' संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत प्रभागातील स्वच्छतेची सद्यस्थिती, कामकाजातील अडचणी आणि



नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी नगरसेवक लायगुडे यांनी स्वच्छता कामात शिस्त, वेळेचे नियोजन आणि प्रत्यक्ष देखरेख यावर विशेष भर देत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

यामध्ये प्रभागातील मुख्य रस्ते व अंतर्गत गल्ल्यांसाठी नियमित झाडणकामाचे निश्चित वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. झाडणकाम व कचरा संकलनाच्या गाड्या नियोजित वेळेत उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी.

मुकादम व आरोग्य सेवकांनी दररोज प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन कामांची पाहणी करून स्वच्छतेत खंड पडू नये याची खात्री करावी. 'स्वच्छ' संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन १०० टक्के कचरा संकलन सुनिश्चित करावे. अशा सूचना त्यांनी उपस्थितांना केल्या. यावेळी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे म्हणाले की, "प्रभाग स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करत नागरिकांचा सहभागही वाढवणे आवश्यक आहे. नियमित देखरेख आणि वेळेवर सेवा दिल्यास स्वच्छतेत निश्चितच सुधारणा होईल."




## एसटी कामगार संघटना राजगुरुनगर आगार अध्यक्षपदी गजानन सांडभोर तर सचिवपदी दत्तात्रय गभाले बहुमताने विजयी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

मान्यताप्राप्त एसटी कामगार संघटना राजगुरुनगर आगार अध्यक्षपदी गजानन सांडभोर यांची तर सचिव पदाकरीता दत्तात्रय गभाले यांची बहुमताने निवड करण्यात आली. एसटी कामगार संघटनेच्या अध्यक्ष व सचिवपदासाठी यावर्षी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. हि निवडणूक प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संघटनेचे विभागीय अध्यक्ष मोहन जेधे व एसटी को. ऑपरेटिव्ह सोसायटी व्यवस्थापक मंगेश सावंत यांनी काम पाहिले. याप्रसंगी स्नेहा कातोरे, पुष्पा चासकर, रुपाली व्यवहारे, कल्पना मोरे, निलम वाळुंज, प्रशांत होले, अजिंक्य फलके, संतोष राक्षे, मच्छिंद्र बोंबले, प्रशांत दौंडकर, गुलाब तिटकारे, निलेश सातकर, राजेंद्र पवार, प्रितेश किर्दक, अमित जगताप, माऊली करंडे, माणिक थिगळे, गोविंद वरे, राजेंद्र कांबळे, विष्णू राठोड, प्रवीण झरांडे, रविंद्र राठोड आदी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेनंतर लगेचच मतमोजणी सुरू झाली. व त्यानंतर निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये सर्वाधीक मतांनी अध्यक्षपदी गजानन सांडभोर तर सचिव पदाकरीता दत्तात्रय गभाले विजयी झाल्याचे घोषीत करण्यात आले. निकाल जाहीर झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी केली. नवनिर्वाचीत अध्यक्ष व सचिवांना सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना सचिव दत्तात्रय गभाले म्हणाले, सर्व कर्मचाऱ्यांच्या अडिअडचणी समजाऊन घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासनाला वेळोवेळी पत्रव्यवहार करत राहणार व कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढा देणार आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष गजानन सांडभोर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे

### निविदा सुचना

ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे यांचे तर्फे १५ वा वित्त आयोग / स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जि. प. पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार / निविदाधारक यांजकडून लिफाफा पद्धतीने खालील कामांची सीलबंद निविदा पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा वाटप ग्रामपंचायत आसखेड बु. ता. खेड जि. पुणे यांच्याकडून दि. २३/०२/२०२६ ते ०६/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यात व स्वीकारण्यात येतील. व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. ०६/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय आसखेड बु. ता. खेड जि. पुणे येथे उघडण्यात येतील किंवा लगतच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मौजे आसखेड बु.|| येथील स्मशानभूमिजवळ सार्वजनिक शौचालय यूनिट बांधकाम करणे / उभारणे | २,९९,९७०/- | ५००/- | ३०००/- | ३ महिने | स्वच्छ भारत मिशन ७०% व १५ वा वित्त आयोग ३०% |

अटी व शर्ती :

१) सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय आसखेड बुद्रुक ता. खेड जि. पुणे येथे सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत सुट्टीचे दिवस वगळून स्वीकारल्या जातील.

२) निविदा स्वीकारणेचे व नाकारणेचे तसेच बदल करण्याचे सर्व अधिकार सरपंच/प्रशासक ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक यांस राहतील.

३) सदर निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा लगतच्या दिवशी उघडण्यात येतील.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक,
ता. खेड, जि. पुणे

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत आसखेड बुद्रुक,
ता. खेड, जि. पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे



### सहयोगनगर टॉवर लाईन परिसरात नव्या ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण

- नगरसेवक सचिन दोडके यांच्याकडून कामाची पाहणी

पुणे (आरंभ पर्व) : वारजे-शिवणे प्रभाग क्रमांक ३२ मधील सहयोगनगर टॉवर लाईन परिसरातील नागरिकांची दीर्घकाळ प्रलंबित असलेली ड्रेनेजची समस्या अखेर मार्गी लागली आहे.. नगरसेवक सचिन दोडके यांच्या पाठपुराव्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून या भागात नव्याने ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. सांडपाणी व अस्वच्छतेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर संबंधित कामाला गती देत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. काम पूर्ण झाल्यानंतर नगरसेवक सचिन दोडके यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परिसरातील नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नव्याने झालेल्या ड्रेनेज व्यवस्थेमुळे परिसरातील स्वच्छतेचा प्रश्न सुटणार असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच हे काम मार्गी लावल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी नगरसेवक सचिन दोडके व पुणे महानगरपालिकेचे आभार मानले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. परिसरातील मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी पुढेही विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास दोडके यांनी व्यक्त केला.



### जेईई मेन २०२६ मध्ये आकाश इन्स्टिट्यूट पुण्याची शानदार कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) अंतर्गत पुण्यातील 16 विद्यार्थ्यांनी जेईई मेन 2026 (सेशन 1) मध्ये पुन्हाएकदा उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्यासातत्यपूर्ण यशाची साक्ष दिली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांनी16 फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या निकालानुसार, जेईई मेन 2026 मध्येआकाश इन्स्टिट्यूट, पुणे येथील 16 विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. दीक्षांत शर्माने 99.99 पर्सेंटाइलसह टॉप स्कोरर म्हणून आपली चमकदार कामगिरी दाखवली. त्याच्यानंतर तेजस कोरेने 99.78 पर्सेंटाइल, तर पियुष यादवने 99.75 पर्सेंटाइल मिळवले. शिवप्रसाद लक्ष्मण देवकरने 99.71 पर्सेंटाइल मिळवले, तर प्रत्युष आलोक कुमार तिवारीने 99.54 पर्सेंटाइलसह उत्कृष्ट यश संपादन केले. कैवल्य विजय घरगेने 99.44 पर्सेंटाइल मिळवले, तर पार्थ निकमने 99.43 पर्सेंटाइल प्राप्त केले. आर्या दिवेकरने 99.35 पर्सेंटाइल मिळवले. निखिल बेवाल आणि सोहम निशिकांत पाटील या दोघांनीही 99.31 पर्सेंटाइल मिळवले.

# कार्यकर्त्यांनो एप्रिलमध्ये मोठ्या मैदानात जल्लोष करूया

## मंत्री चंद्रकांत पाटील : विधान परिषदेवर राजेंद्र राऊत यांची वर्णी लागण्याचे स्पष्ट संकेत





**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक वाढीसाठी सातत्याने कार्यरत असलेले माजी आमदार राजेंद्र राऊत यांना विधान परिषदेची संधी मिळण्याचे ठोस संकेत मिळत असून, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे या चर्चेला अधिक बळ मिळाले आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यातील राजकीय वातावरणात उत्सुकता निर्माण झाली आहे.

बार्शी येथे आयोजित सत्कार समारंभात नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत विजयी झालेल्या सदस्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले,उपनगराध्यक्ष रोहित पाटील, संतोष निवाळकर, मोहन डांगरे,बाजार समिती सभापती विजय गरड, उपसभापती बाबा गायकवाड, अनिल डिसले ,अरुण कापसे, सुरेश पाटील, अशोक लोढा, ॲड. अविनाश गायकवाड, डॉ. भारत पेंढे, बाबा कापसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय दिला जाईल, असे सांगत स्थानिक नेतृत्वाच्या कार्याचे कौतुक केले. त्यांच्या या विधानामुळे राजेंद्र राऊत यांच्या विधान परिषदेतील आमदारकीची शक्यता बळावल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली आहे.

राजेंद्र राऊत यांनी बार्शी तालुक्यात ग्रामीण भागात संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने संपर्क ठेवला असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला मिळालेल्या यशामध्ये त्यांचे नियोजन आणि नेतृत्व महत्त्वाचे ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विकासाच्या मुद्द्यांवर काम करताना पाणी, सिंचन, रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधा यांना प्राधान्य देण्याचा निर्धारही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील शेती आणि पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी सिंचन, साठवण तलाव आणि विविध योजनांद्वारे सुमारे ५० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आले. या सत्कार समारंभामुळे बार्शीतील भाजप कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळाली असून, राजकीय घडामोडींमध्ये राजेंद्र राऊत यांना आमदारकी मिळावी हीच कार्यकर्त्यांची भावना यानिमित्त जागृत होत आहे.

कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करत "कार्यकर्त्यांनो, एप्रिलमध्ये मोठ्या मैदानावर भेटूया, मोठा जल्लोष करूया" असे पाटील यांनी सांगितले.

त्यामुळे एप्रिल महिन्यात विधान परिषदेचे निवडणूक होत आहे. त्यामुळे राऊत यांना संधी मिळाल्यानंतर मोठे शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता व्यक्त होत असून, याकडे तालुक्याचे राजकीय लक्ष लागले आहे.


## "ट्रायंगल" मराठीतील पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदी किंवा दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आजवर अनेक स्पाय थ्रिलर चित्रपट झाले आहेत. मात्र, मराठी चित्रपटात असलेली स्पाय थ्रिलर चित्रपटांची उणीव आता भरून निघणार आहे. "ट्रायंगल" हा मराठी चित्रपटसृष्टीतला पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट ठरणार असून, अर्जून करे हा नवा चेहरा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. देशभक्ती, निष्ठा आणि धाडसाची अनोखी गोष्ट या निमित्ताने मराठी भाषेतून मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. वैष्णवी फिल्म्सची निर्मिती असलेल्या "ट्रायंगल" या चित्रपटाची निर्मिती विकी सूर्यवंशी आणि सुखदेव आढाव यांनी केली असून लेखन आणि दिग्दर्शन विकी सूर्यवंशी यांनी केलं आहे. राजकीय आणि गुप्तधार्मिक जगतातील गुंतागुंत या चित्रपटात मांडण्यात आली आहे. भारताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली इंडियन ओशन सिक्युरिटी सिस्टिम डॉक्युमेंट्स चोरी करण्याचा प्रयत्न परदेशी संस्था करतात आणि सुरू होतो एक आंतरराष्ट्रीय खेळ... वेगवान कथा, उत्कृष्ट ॲक्शन सिक्वेन्स हे चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे.



## शरदचंद्रजी पवार प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

"मज आवडती मनापासून ती शाळा..." या भावस्पर्शी ओळींनी सुरुवात करत शरदचंद्रजी पवार प्रशालेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षे ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्या शाळेला निरोप देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांच्या भावना अनावर झाल्या.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी, शिक्षकांबद्दलचा आदर आणि मित्रांबरोबरचे जपलेले क्षण व्यक्त करत मनोगते मांडली. विद्यार्थ्यांचे भावनिक शब्द ऐकून उपस्थित शिक्षक व पालकांचेही डोळे पाणावले. शाळेतील शैक्षणिक प्रवास, संस्कार आणि जपलेल्या नात्यांची आठवण यावेळी प्रत्येकाच्या मनात दाटून आली.

कार्यक्रमाला शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विलासदादा गाटे, पंचायत समितीच्या नूतन सदस्य सौ. सविता साबळे, सरपंच सुवर्णा काकडे, उपसरपंच जितेंद्र चौधरी, मुख्याध्यापक दीपक खंदारे, सहशिक्षक विश्वनाथ साबळे, अण्णासाहेब खोत, आर. पी. गायकवाड, श्रीमती शिवगंगा गाडगे ,

श्रीमती निता लाटे ,श्रीमती सारिका गवळी मॅडम विद्यार्थी दिनाच्या मुख्याध्यापिका कुमारी प्रियांका आवटे यांच्यासह शिक्षकवृंद व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षक विश्वनाथ साबळे यांच्या पत्नी सविता साबळे या पंचायत समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा देत आणि शाळेच्या आठवणी मनात जपण्याचा संदेश देत करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णासाहेब खोत सर यांनी, तर आभार प्रदर्शन विश्वनाथ साबळे यांनी केले.

## उत्तमनगर-शिवणे ड्रेनेज लाईन कामाचा भूमिपूजन सोहळा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मधील उत्तमनगर-शिवणे परिसरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आवार तसेच मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पावसाळी ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला.

जनतेच्या शुभाशिर्वादाने जेष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कार्यक्षम नगरसेवक मा. सुभाषभाऊ नाणेकर , नगरसेविका सौ. धनश्रीताई दत्ताभाऊ कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. परिसरातील नागरिकांना पावसाळ्यातील पाणी साचणे, वाहतुकीची अडचण व अस्वच्छतेच्या समस्यांचा मोठा त्रास होत होता. नव्याने होणाऱ्या या ड्रेनेज लाईनमुळे या समस्येतून दिलासा मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या प्रसंगी भाजपा नेते मा. दत्ताभाऊ कोल्हे, अध्यक्ष मा. विजयजी मते, उपाध्यक्ष मा. अनिलजी मते, अध्यक्ष मा. निखिलजी धावडे, उपाध्यक्षा सौ. निलिमा गणेश गवांडे, ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड, सरपंच मा. उमेशराव सरपाटील, उद्योजक मा. सुभाषशेठ शिंदे (सरकार), अध्यक्ष मा. सारंग (बाप्पू) राडकर, अध्यक्ष मा. प्रमोदजी धुमाळ, जनसेवक मा. गणेशभाऊ गवांडे, उपसरपंच मा. विजयराव चांदणे, अध्यक्ष मा. प्रकाशजी साळवे, नेते मा. सचिनभाऊ कांबळे, मा. अजयजी बाबर, मा. हेमंतजी पिंजण, मा. सुनिल (बाप्पू) नाणेकर, मा. कैलास (आप्पा) नाणेकर, मा. दत्ताभाऊ नाणेकर, मा. बाळासाहेब धावडे, मा. विलासजी धावडे, मा. सचिनभाऊ नाणेकर, मा. ओंकारजी नाणेकर, मा. श्रीरंगजी भिंगारदिवे, मा. गजाननजी वानखेडे, मा. साळुंके मामा यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला आघाडीच्या पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामामुळे परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यातही विकासकामांना गती दिली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## क्रीडा पत्रकारितेवर शोककळा; विक्रांत आढाव यांचे निधन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रीडा पत्रकारितेत आपली ठळक ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार विक्रांत आढाव (वय ५२) यांचे शनिवारी (ता. २१) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यातील पत्रकारिता क्षेत्रासह क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. विक्रांत आढाव यांनी दीर्घकाळ क्रीडा पत्रकार म्हणून काम करताना विविध राष्ट्रीय-राज्यस्तरीय स्पर्धांचे सखोल वार्तांकन केले. क्रिकेट, कुस्ती, ॲथलेटिक्ससह विविध क्रीडा प्रकारांवरील त्यांचे अभ्यासपूर्ण लिखाण आणि स्पष्ट मांडणीमुळे ते वाचकांमध्ये लोकप्रिय होते. क्रीडा क्षेत्रातील घडामोडींवर त्यांचा अचूक दृष्टिकोन आणि तरुण पत्रकारांना दिलेले मार्गदर्शन यामुळे त्यांनी पत्रकारितेत वेगळी छाप सोडली. त्यांच्या अकाली निधनाने सहकारी पत्रकार, क्रीडापटू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. अनेकांनी सोशल मीडियाद्वारे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## पाणी प्रश्नावर हरिदास चरवड यांचा सभागृहात आवाज



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील पाणीटंचाईचा मुद्दा चांगलाच गाजला. समाविष्ट गावांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित करत भाजपचे नगरसेवक हरिदास चरवड यांनी प्रशासनाला धारेवर धरले. प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-धायरी-वडगाव परिसरात अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार त्यांनी सभागृहात मांडली. "समाविष्ट गावे असूनही शहरात केवळ दहा मिनिटे पाणी सोडले जात आहे. हा कसला न्याय? नागरिकांना मूलभूत सुविधेसाठी त्रास सहन करावा लागत आहे, आणि प्रशासन मात्र डोळेझाक करत आहे," असा संतप्त सवाल चरवड यांनी उपस्थित केला. या भागातील नागरिकांना नियमित व पुरेशा वेळेचा पाणीपुरवठा मिळावा, तसेच या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. यावर महापौर मंजुषा नागपुरे यांनी पाणीपुरवठा विभागाला सुनावले व संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या. पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी जगताप यांनी यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.






## "शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा चित्रपट"- उपमुख्यमंत्री

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'शतक' चित्रपटासाठी दिल्या खास शुभेच्छा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी प्रेक्षकांना 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे. शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. एकंदरीतच या चित्रपटाबद्दल सांगताना ते म्हणाले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासावर आधारित शतक हा चित्रपट आपल्या भेटीला येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या गीताचे अनावरण डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते झाले, हे या कलाकृतीसाठी सर्वात मोठे पाऊल आणि आशीर्वाद आहे. यापुढे ते म्हणाले की, "हा केवळ एक चित्रपट नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या स्थापनेपासून राष्ट्रभक्तीचे संस्कार आणि समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या हजारो स्वयंसेवकांचा त्याग, कष्ट आणि समर्पणाची ही जिवंत गाथा आहे. शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट येणाऱ्या पिढीसाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल, याची मला खात्री आहे. या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि संपूर्ण टीमचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांना शुभेच्छा देतो. हा चित्रपट घराघरांत आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात 'राष्ट्रप्रथम' हा भाव अधिक दृढ व्हावा, हीच सदिच्छा.""शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट संघाचा विचारप्रवास, सामाजिक उपक्रम आणि देशसेवा यांचा आढावा घेतो. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरनंतर या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.